**प्रेस नोट** **दि.१०/८/२०१९**

**दि.१०/८/२०१९ रोजी पुणे शहर पोलीसांकडून फिर्यादी व मालकास गुन्ह्यातील किंमती व मौल्यवान असा मुद्देमाल पुन: प्रदान करण्याचा कार्यक्रमाबाबत.**

पुणे पोलीस आयुक्तालयामार्फत मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे संकल्पनेमधुन व मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखालील कॉप्स एक्सलन्स हॉल, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर येथे पुणे शहर पोलीसांकडून फिर्यादी व मालकास गुन्ह्यातील किंमती व मौल्यवान असा मुद्देमाल पुन: प्रदान करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास खालील अधिकारी व कर्मचारी तसेच फिर्यादी व मालक उपस्थित होते.

श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर. तसेच श्री. बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर व इतर परिमंडळीय पोलीस उप आयुक्त तसेच सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक (गुन्हे), संबंधीत पोलीस स्टेशनचे मुद्देमाल कारकुन व फिर्यादी / मालक तसेच वेगवेगळ्या प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी असे एकुण **300** लोक उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये विविध पोलीस स्टेशनकडील एकुण 73 गुन्ह्यातील किंमत रुपये 1,18,70,900/- चे सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल, वाहने असा मुद्देमाल श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर व इतर वरिष्ठ अधिकारी यांचे हस्ते संबंधीत फिर्यादी व मालक यांना पुन: प्रदान करण्यात आला आहे.

वरील मुद्देमालापैकी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ 4 या परिक्षेत्रातील पोलीस स्टेशनकडील एकुण 24 गुन्ह्यामधील मुद्देमाल असून तो इतर परिमंडळापेक्षा जास्त आहे. त्यामध्ये सोन्याचे दागिने, 12 वाहने तसेच 28 मोबाईल फोन आहेत. परिमंडळ 1 परिक्षेत्रातील पोलीस स्टेशनमधील एकुण 18 गुन्ह्यातील मुद्देमाल असून, त्यामध्ये सोन्याचे दागिने, रोख रक्कम, 06 वाहने व 03 मोबाईल फोन आहेत. समर्थ पोलीस स्टेशनकडील एकुण 09 गुन्ह्यातील मुद्देमाल असून, इतर पोलीस स्टेशनपेक्षा अधिक संख्येने आहे, त्यामध्ये सोन्याचे दागिने व 05 वाहने आहेत.

श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांनी सर्व उपस्थितांना सी.सी.टि.व्ही लावणेबाबत तसेच आवश्यक तेथे वॉचमन नेमण्याबाबत आवाहन केले. त्यानंतर उपस्थितांपैकी श्री. कांतीलाल प्रजापती, श्री. श्यामसुंदर निभोरकर, श्रीमती. रश्मी दास व श्री. सोपान कदम (आय.टी. इंजिनिअर) यांनी मुद्देमाल परत मिळवून देणेकामी पुणे पोलीसांनी केलेल्या कामगिरीबाबत अभिनंदन तसेच पोलीसांकडून तातडीने मिळालेल्या सहकार्याबद्दल विशेष आनंद व आभार व्यक्त केले

सदर कार्यक्रमाचे सुत्र संचालन, डॉ. श्री. शिवाजी पवार, सहायक पोलीस आयुक्त अभियोग, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी व प्रस्तावना श्री. बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांनी केली असून, आभार प्रदर्शन श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, पीसीबी, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केले.


दिपक रमेश वाधवानी




COPS EXCELLENCE
COPS EXCELLENCE

